**शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयातील नचित्रपट्टी व सीडी वरील जतन करुन ठेवण्यात आलेल्या अभिलेखांचे डिजिटायझेशन(digitisation)खर्चास मान्यता देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मुद्रांक-२०२४/प्र.क्र.११/म-१(धोरण)**
**दालन क्र.एम-७ ए, पोटमाळा, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२**
**दिनांक : २७ सप्टेंबर, २०२४.**

<u>**वाचा**</u> : १) शासन ज्ञापन क्रमांक : आस्थापना -२००१/प्र.क्र.४१०/म-१, दि.३१.१०.२००१
२) शासन निर्णय क्रमांक: नोंदणी (संगणक)-२०१५/१५१७/प्र.क्र.४५२/म-१, दि.०८ ऑक्टोबर, २०१५.
३) शासन शुद्धिपत्रक क्रमांक: मुद्रांक-२०१७/३२६६/प्र.क्र.५०४/म-१, दि. १९ जून, २०१८
४) शासन शुध्दीपत्रक क्रमांक: मुद्रांक २०१७/३२६६/प्र.क्र.५०४/म-१(धोरण), दि.११.१.२०२१
५) शासन निर्णय क्रमांक : मुद्रांक-२०१७/३२६६/प्र.क्र.५०४/म-१(धोरण), दि.३१.३.२०२३
६) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र. का.४/प्र.क्र.१३५५/२०२३/३२, दि.०८ जानेवारी,२०२४ व दिनांक ३.७.२०२४

<u>**प्रस्तावना:-**</u>

महसूल व वन विभाग,शासन ज्ञापन दिनांक ३१.१०.२००१ अन्वये नोंदणी व मुद्रांक विभागाचे बांधा, वापरा, हस्तांतरण करा या तत्वावर संगणकीकरण करण्यासाठी "स्वीय प्रपंजी लेखे उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र. ४ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयात निर्धारित केलेल्या "स्वीय प्रपंजी लेख्यात" जमा होणाऱ्या रकमेतून शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय दरमहा खर्च करण्याची मर्यादा रु. १० कोटी इतक्या रकमेच्या मर्यादेपर्यंत वाढविण्यात आली आहे.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडून प्राप्त संदर्भ क्र.६ अन्वये शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयातील नचित्रपट्टी व सीडी वरील जतन करुन ठेवण्यात आलेल्या अभिलेखांचे डिजिटायजेशन (digitization) करण्याबाबच्या महत्वपूर्ण प्रकल्पास मंजूरी तसेच प्रकल्पास आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सन १९२७ ते २००१ पर्यंतच्या उपलब्ध अभिलेखांचे डिजिटायजेशन (digitisation) केल्यास अभिलेख नागरिकांना संगणकावर ऑनलाईन उपलब्ध होवू शकतील. तसेच त्यामुळे जागेची कमतरता व वेळेचा अपव्यय टाळता येईल. नागरिकांना अभिलेख सहजपणे त्वरित उपलब्ध झाल्याने तक्रारींचे प्रमाण कमी होईल. तसेच अभिलेखांचे अत्यंत प्रभावी पध्दतीने कायमस्वरुपी जतन व संवर्धन होणार असल्याने, अभिलेख जतन, हया विभागाच्या महत्त्वाच्या उदिदष्टाची देखील पूर्तता होणार आहे.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी संदर्भ क्र.६ अन्वये नोंदणी व मुद्रांक विभागातील सन १९२७ ते २००१ पर्यंतच्या अभिलेख्यांचे डिजीटायझेशन(digisation) महत्वपूर्ण प्रकल्पास मंजूरी देण्याबाबत तसेच सदर कार्यपध्दतीच्या अंमलबजावणीकरिता येणारा खर्च रु.२१,४१,००,०००/ (अक्षरी रु.एकवीस

कोटी एक्केचाळीस लाख रुपये) फक्त) स्वीय प्रपंजी लेख्यात जमा होणाऱ्या रकमेमधून माहे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या कालावधीत खर्च करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

**शासन निर्णय:-**

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे अधिनस्त शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय,पुणे कार्यालयातील सन १९२७ ते २००१ पर्यंतच्या नचित्रपट्टी व सीडी वरील जतन करुन ठेवण्यात आलेल्या उपलब्ध अभिलेखांचे डिजीटायजेशन (digitisation ) करण्याबाबतच्या महत्वपूर्ण प्रकल्पास शासन मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर प्रकलपाच्या अंमलबजावणीकरिता एकूण रु. २१,४१,००,०००/-(अक्षरी रु.एकवीस कोटी एक्केचाळीस लाख रुपये) फक्त) इतका माहे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या कालावधीत स्वीय प्रंपजी लेख्यातून कामाच्या प्रगतीनुसार टप्प्या-टप्प्याने प्रतिमहा रु. १० कोटीच्या मर्यादेत खर्च करण्यास एक विशेष बाब म्हणून या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च हा ज्या बाबींसाठी मंजूर करण्यात आला आहे, त्याच बाबींसाठी खर्च करण्यात यावा. खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग, **अनौ.संदर्भ क्र.३३८/व्यय-१०, दिनांक २३.८.२०२४** अन्वये प्राप्त सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक ------------ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

२८।८।२०२४

**(सुनिल जाधव)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत:

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. सर्व मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा. सभापती. विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
६. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई

१०. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे
११. अपर मुद्रांक नियंत्रक,प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई
१२. महालेखापाल-१ व २ (मुंबई/नागपूर)महाराष्ट्र राज्य
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५. निवडनस्ती कार्यासन म-१(धोरण), महसूल व विभाग, मंत्रालय,मुंबई